मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

अंक १०-११-१२ • वर्ष १७ वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२०

# हसती दुनिया (मराठी)

अंक १०-११-१२ • वर्ष १७ वे • पृष्ठे ५२
• ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२०

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक) • सहसंपादक सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. ऱ्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९



## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १२
- शब्दकोडे १३
- हसा मुलांनो हसा १४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- दिव्यवाणी ३०
- आरोग्याचा मंत्र ३५
- सामान्य ज्ञान ४५
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ४८
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८

## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- विशेष २२
- भ्रमंती २८
- तेजस्विनी ३१
- समर्थ दर्शन -भाग ६८ ३२
- विशेष माहिती ३६
- मत्स्य जगत ४७
- विश्व जगत ४९

## कथा


- पौराणिक कथा ०५
- श्रेष्ठ समर्पण ०८
- पैज २०
- तीन दागिने २४
- विनोबांचे बालपण ४२
- मी विद्यार्थी आहे ४३

## कविता


- बालदिन २५
- आंतरराष्ट्रीय शांतता दिन ४६
- आंतरराष्ट्रीय शांतता दिन ४६

# चालणे गरजेचे

एक मनुष्य रोज भगवान बुध्दांचं प्रवचन ऐकायला येत असे. तो त्यांची प्रवचनं अतिशय एकाग्रतेने श्रवण करत असे. बुध्द आपल्या प्रवचनात दुर्गुणांचा त्याग करण्याविषयी प्रेरणा देत असत. परोपकार व सद्गुण धारण करण्याबाबतच्या अनेक गोष्टी समजावून सांगत.

एके दिवशी तो मनुष्य भगवान बुध्दांकडे आला व म्हणाला, "भगवन्! मी जवळजवळ दोन महिन्यांपासून तुमची प्रवचनं ऐकत आहे; तुमची प्रवचनं ऐकायला गोड वाटतात. खूप आनंद येतो; परंतु तुमच्या प्रवचनांचा माझ्यावर व्हावा तसा परिणाम झालेला नाही. माझ्यातील अवगुण कमी झाले नाहीत आणि सद्गुणांचीही वाढ झाली नाही." त्यावर बुध्द मंदस्मित करत म्हणाले, "बंधू तू कुठे राहतोस" तो म्हणाला, "इथून चार कोसावर माझं घर आहे." बुध्दांनी विचारलं, "आता तू तुझ्या घरी कसा जाणार?" तो म्हणाला, "बैलगाडीने. कधी बैलगाडी नसली तर घोड्यावरुन किंवा पायी जातो." बुध्दांनी पुन्हा विचारलं, "जर समजा, तुझ्याकडे बैलगाडी किंवा घोडा नाही आणि तुला पायीदेखील जायचं नाही. तर इथं बसल्या बसल्या तू घरी पोहचशील का?" तो म्हणाला, नाही. घरी पोहचायचं असेल तर कुठल्या ना कुठल्या साधनाने किंवा पायी जावच लागेल.

भगवान बुध्द म्हणाले, "आता तू खरं तर शहाण्यासारखं बोललास. मित्रा, कुठल्याही ठिकाणी पोहचायचं असेल तर काहीतरी साधन हवेच. निदान पायी तरी चालायला हवे. मग मला सांग, तुझ्यामध्ये जर सद्गुण यावेत असे वाटत असेल तर तुला काही ना काही प्रयत्न करायला नको का? तू जर फक्त ऐकून निघून गेलास तर तुझ्यात प्रगती कशी होईल. तुला सद्गुणांचा लाभ झाला नाही तर तुझ्या जीवनात आनंद कसा येईल?"

तात्पर्य, केवळ ऐकून, वाचून, पाठांतर करुन किंवा इतरांना ऐकवून आपल्यामध्ये सुधारणा घडून येणार नाही. आपणही सत्संगात जातो, विचार श्रवण करतो; परंतु त्यावर चिंतन-मनन केले पाहिजे. स्वत:मधील अवगुण शोधून एकेक अवगुणांचा कटाक्षाने त्याग केला पाहिजे. सत्याच्या, ज्ञानाच्या मार्गाने चालण्याचा सतत सराव केला पाहिजे. तेव्हाच आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो. आपल्याला हवे असलेले ध्येय प्राप्त करु शकतो.

- राजेंद्र थोरात •••

# माता सीतेला भूमातेने पोटात घेतले

श्री रघुनाथ, ऋषी-मुनी-राजे, वानर सारेजण अनेक दिवसापर्यंत त्या रामायण कथा-काव्याची अवीट गोडी चाखत होते. श्रवणसुख घेत होते. हळूहळू त्यांच्या लक्षात आले की, हि बालके माता सीतेची आहेत त्यांनी दोन दूत वाल्मिकींकडे पाठविले व निरोप दिला,

"वाल्मिकीमुनींची अनुमती घेऊन, इथं येऊन सीतेने जनसमुदायासमोर आपली शुध्दता सिध्द करावी."

यावर मुनिवरांचा उलट निरोप आला, "श्रीरघुनाथ जी आज्ञा देतील, तेच सीता करील. कारण पती हा स्त्रीचा देव असतो."

दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीरामचंद्र यज्ञशालेत उपस्थित झाले. सर्व ऋषी, मुनी, महाजन, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे सर्व मोठ्या संख्येने उपस्थित झाले. माता सीतेचे शपथग्रहण पाहण्यासाठी ज्ञाननिष्ठ, कर्मनिष्ठ व योगनिष्ठ सर्व प्रकारचे लोक आले होते.

सभेत एकत्र आलेले सर्व लोक दगडाप्रमाणे निश्चल होऊन बसले होते. मुनिवर वाल्मिकी माता सीतेला घेऊन त्वरित तेथे आले. महर्षीच्या मागून सीता अधोमुखी होऊन चालत होती. श्रीरामांच्या चिंतनात रममाण असलेल्या माता सीतेला पाहून साऱ्या सभेत एक मुग्ध शोकव्याकुळ कोलाहल उसळला. सभेच्या मध्यावर येऊन मुनिवर वाल्मिकी सीतेसह थांबले व मोठ्याने घोषपूर्ण स्वरात म्हणाले,

"दाशरथी, ही सीता सुव्रता व धर्मचारिणी आहे. तुम्ही लोकोपवादाला घाबरुन हिचा त्याग केला. माझ्या आश्रमाजवळ सोडले. सीता तुम्हाला शुध्दतेची प्रचीती देईल. श्रीरामा, हे दोन कुमार कुश आणि लव जानकीचे व तुमचे पुत्र आहेत. ती जुळी बालके आहेत. मी माझ्या साऱ्या तपश्चर्येला स्मरुन हे सत्यपूर्वक सांगत आहे." यावर श्रीराम जनसमुदायाला हात जोडून वाल्मिकींना म्हणाले,

"महाभाग, तुम्ही धर्मवेत्ते आहात. मला सीतेच्या शुध्दतेची पूर्ण खात्री आहेच. पूर्वीही एकदा तिच्या शुध्दतेचा प्रत्यय देवांसमोर आला होता, परंतु पुन्हा लोकोपवाद उभा राहिला. विवश होऊन मला सीतेचा त्याग करावा लागला. ब्रह्मन् सीता सर्वथा निष्पाप आहे हे ठाऊक असताना देखील लोकभयानं मी तिचा पूर्वी एकदा त्याग केला होता. तो माझा अपराधच होता; परंतु आपण समजून घ्यावे आणि मला क्षमा करावी. सीता पवित्र आहे. कुमार लव-कुश हे दोघे सीतेचे आणि माझे पुत्र आहेत, याची मला पूर्ण खात्री व विश्वास

आहे. तथापि जनसमुदायासमोर पुन्हा एकदा सीतेचे शुध्दीप्रामाण्य झाल्यावरच मी सीतेचा स्वीकार करेन.”

माता सीता हात जोडून म्हणाली, “मी श्रीरघुनाथाशिवाय इतर कुठल्याही पुरुषाचं मनानं चिंतनदेखील केलेलं नाही. जर हे सत्य असेल तर भगवती, माता पृथ्वीदेवी मला आपल्या उदरात स्थान देईल. मन, वाणी आणि क्रियाद्वारे जर मी केवळ श्रीरामांचीच आराधना करीत असेन, तर पृथ्वीमातेने आपल्या उदरात मला जागा द्यावी.” विदेहकुमारी भूमिकन्या सीतेने असा तीनवेळा आपल्या शपथेचा उच्चार करताच अद्‌भुत चमत्कार झाला.

उपस्थित सर्व सभाजनांच्या साक्षीने भूमी दुभंगली. नागांनी आपल्या शीर्षावर धारण केलेले दिव्य सिंहासन भूमीच्या पोटातून वर आले. साक्षात धरतीमाता मूर्तरुपाने तेथे प्रकट झाली. मिथिलेशकुमारी माता सीतेला तिने आपल्या दोन्ही भुजांनी कवटाळले. वर उचलून सिंहासनावर अधिष्ठित केले.

धरतीमाता मग सिंहासनाधिष्ठित माता सीतेसह धरतीच्या पोटात रसातळाच्या दिशेने निघाली. सारेजण अवाक् होऊन पाहू लागले. सर्वांच्या तोंडून उत्स्फूर्त व अस्फुट उद्‌गार बाहेर पडले, “माता सीते, तू धन्य आहेस!” देवांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली.

-क्रमशः

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी आंध्र प्रदेशातील प्रसिध्द तीर्थक्षेत्र तिरुपती बालाजीपासून जवळच असलेल्या तिरुत्ताणी या गावी झाला. बालपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड असल्याने पुस्तकांना ते उत्तम मार्गदर्शक व विश्वासू मित्र समजत. वाचन, मनन, चिंतन, अध्यापन यातून झालेल्या संस्कारामुळेच तत्त्वज्ञानाची आवड निर्माण होऊन पुढे बी.ए.ला त्यांनी एक विषय तत्त्वज्ञान निवडला. डॉ. राधाकृष्णन हे एक आदर्शवादी विचारवंत-अध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालणारे थोर तत्वज्ञ, नीतिशास्त्रज्ञ, हाडाचे शिक्षक-आदर्श शिक्षक म्हणून गौरविले गेले. त्यांच्या मते, खरा गुरु तोच जो विद्यार्थ्यांना बौध्दिक व आध्यात्मिक दोन्ही ज्ञानामृत पाजतो. शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते संबंध जिव्हाळ्याचे असावेत. नाही तर शिक्षण ही एक यांत्रिक क्रिया बनते, असे ते म्हणत. हिंदू संस्कृतीचे संवर्धन, संस्कृतचा अभ्यास व जगाला शांतता लाभावी यासाठी त्यांनी उत्तम मार्गदर्शन केले. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या डॉ. सर्वपल्लींचे जीवन ऋषितुल्य होते. विद्यापीठ हे आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे दालन आहे, माणसाला या ठिकाणी माणूस बनविण्याचे महान कार्य केले जाते हे जाणून त्यांनी स्वतः दीर्घकाळ विद्यापीठांमधून अध्यापन केले. आपल्या अलौकिक बुध्दिमत्तेने प्रसिध्द असलेले डॉ. राधाकृष्णन यांचे विज्ञान, तत्त्वज्ञान, अध्यात्म, नितिशास्त्र, इंग्रजी या विषयांवर प्रभुत्व होते. भारतात व पाश्चात्य देशात त्यांनी शिक्षणावर अनेक व्याख्याने दिली. त्यांचे व्याख्यान ऐकून इंग्लडचे पंतप्रधान इडन हे प्रभावित झाले

(पान ९ वर)

# श्रेष्ठ समर्पण

एक माळी होता. तो जंगलातून फुलं गोळा करुन आणत असे. ती विकून आपला चरितार्थ चालवत असे. एके दिवशी त्याला सुंदर कमळाचं फूल दिसलं. चिखल तुडवत तो त्या फुलापाशी पोहचला. त्याने ते फूल अलगद तोडले आणि बाजारात विकायला घेऊन गेला. त्याच दिवशी भगवान गौतम बुध्दांचं आगमन त्या नगरीत झालं होतं. लोक त्यांच्या दर्शनासाठी जाताना फुलं घेऊन जात होते. माळ्यालाही वाटलं आपणही हे फूल न विकता भगवान बुध्दांना अर्पण करावं. तेवढ्यात एका धनाढ्य व्यक्तीने त्या फुलाचे २ चांदीचे नाणे देऊ केले. एक आण्याचं फूल एवढं महाग विकलं जातय याचा त्याला आनंद झाला; पण दुसऱ्याच क्षणी त्याने निश्चय केला, की काही का असेना हे फूल आपणच बुध्दांना अर्पण करायचे. थोड्या वेळाने सावकार आला. त्याने त्या फुलांची किंमत म्हणून दहा चांदीची नाणी देऊ केली; पण माळ्याने काही फूल दिले नाही. फूल पाहण्यासाठी आणि विकत घेण्यासाठी गर्दी जमली होती. ती गर्दी पाहून त्या नगरीचा सेनापती तिथे आला. त्याने तर त्या फुलासाठी शंभर चांदीची नाणी देऊ केली; पण माळी आपल्या निश्चयावर ठाम होता. तेवढ्यात राजाचा लवाजमा बुध्दांच्या दर्शनासाठी निघाला होता. तिथंली गर्दी पाहून राजाने सेनापतीकडे

चौकशी केली. सेनापती म्हणाला, "शंभर चांदीची नाणी कबूल केली तरी तो माळी ते कमळाचं फूल देत नाही." राजा म्हणाला, "त्याला एक हजार चांदीची नाणी द्या. ते फूल मी स्वतः भगवान बुध्दांच्या चरणी वाहीन." माळ्याने तोही सौदा नाकारला. राजाने त्याला सांगितले, "अरे वेड्या, एवढ्या संपत्तीने तर तुझी गरिबी कायमची दूर होईल, तुझ्या संपूर्ण कुटुंबाचा उध्दार होईल."

त्यावर माळी म्हणाला, "महाराज, राजाच्या संपत्तीने कुणाचा उध्दार झालेला कधी ऐकलं नाही; पण संत महात्म्यांच्या कृपादृष्टीने मात्र अवश्य उध्दार होतो."

राजा म्हणाला, "वा! अगदी खरं बोललास. तुला फूल द्यायचं नसेल तर नको देऊस, मी तुझ्यावर सक्ती करणार नाही." असे म्हणून राजा भगवान बुध्दांच्या दर्शनासाठी निघून गेला. दर्शनासाठी मोठी रांग लागली होती.प्रत्येक जण आपापल्या कुवतीप्रमाणे बुध्दांना भेटवस्तू अर्पण करत होता. त्यानंतर माळी पुढे गेला. भगवान बुध्दांची करुणामय दृष्टी त्याच्यावर पडताच त्याच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. त्यातले काही थेंब कमलपूष्पावर पडले. ते फूल भगवान बुध्दांना अर्पण करत तो म्हणाला, "भगवान! मी गरिब, पामर आहे. आपल्या चरणी केवळ हे फूल आणि मी आतापर्यंत केलेल्या पापाचा भार वाहतो आहे, मला सर्व पापतून मुक्त करा."

भगवान मंदस्मित करत आपला शिष्य आनंदला म्हणाले, "पाहिलंस आनंद, हजारो राजे-महाराजांनी जे पुण्य कमावलं नाही ते या सामान्य भक्ताने कमावले. हजारो चांदीच्या मुद्रा लाथाडून त्याने सर्वस्व अर्पण केले आहे. कुटुंबाच्या भरणपोषणाचाही विचार केला नाही. त्याचे समर्पण खरचं श्रेष्ठ आहे." असे म्हणून भगवान बुध्दांनी त्याला खूप आशीर्वाद दिले.

❖❖❖

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

(पान ७ वरुन)

होते. रशियाचे स्वतंत्र भारताचे राजदूत म्हणून त्यांची नेमणूक झाली. रशियाचे अध्यक्ष स्टॅलिनवरही त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची व उच्च विचारांची छाप पडली होती.

विद्यार्थीप्रिय गुरु, जगाचे गुरु म्हणून ते ओळखले जात. त्यांचे गुरु प्रोफेसर हॉग यांच्यावर त्यांची नितांत श्रध्दा होती. साधी राहणी व उच्च विचारसरणी यामुळे ते विद्यार्थ्यांत शूचिता व पावित्र्य निर्माण करु शकले. दुर्दम्य आत्मविश्वास असणारे शिक्षणप्रेमी डॉ. राधाकृष्णन आदर्श शिक्षक, कुलगुरु, उपराष्ट्रपती व राष्ट्रपती म्हणून भारताला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक लाभले होते. १९५८ साली भारताने त्यांच्या कार्याचा गौरव त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च किताब देऊन केला. थोर तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ डॉ. राधाकृष्णन यांचे वृध्दापकाळाने २४ एप्रिल १९७५ मध्ये निधन झाले. शिक्षकाला गुरु व गुरुला देव मानण्याची प्रार्थना टिकवून ठेवायची असेल, तर देशाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे विद्यार्थी ज्ञानी घडवावेत हीच शिक्षकांकडून अपेक्षा.

❖❖❖

## विचारपुष्प

# निराकाराचा आधार घ्यावा

आज आपण मिशनचा एक भाग आहोत. जर आपण मिशनची शिकवण धारण करुन त्यानुसार चाललो तर येणारी पीढीदेखील तोच भाव धारण करील. निराकाराचा आधार जीवनात घेईल. त्यांच्यामध्येही तोच भाव निर्माण होईल.

एक भगिनी सेवेमध्ये व्यस्त होती. रात्री तिचा मुलगा घरी आलेला नव्हता. रात्रभर मुलाचा पत्ता नाही, तरी ती भगिनी मुलाची चिंता न करता सेवेत तत्पर राहिली. तिला घरुन फोन आला, की मुलाचा रात्री अपघात झाल्याने तो येऊ शकला नाही. रात्रभर त्याला आय.सी.यु. मध्ये ठेवले होते. सकाळी शुध्दीवर आल्यानंतर डॉक्टरांनी त्याला

फोनवर त्याच्या आईशी संपर्क करुन दिला. त्यावेळी मुलगा आईला म्हणाला, आई तू सेवा सोडून हॉस्पिटलला येऊ नको. एवढ्या लहान वयात त्या मुलाचा भाव किती कौतुकास्पद होता. मिशनची शिकवण धारण करण्याचा परिणाम आहे हा!

जीवनात चढ-उतार येतच असतात, पण मनाचे नाते जर निराकाराशी जोडलेले असेल तर प्रतिकूल परिस्थितीतही त्यावर दृढ राहता येतं. संतांची शिकवण आणि निराकाराचा आधार जर घेतला तर जीवन सहज-सोपे वाटू लागते. सांसारिक दु:ख आपल्याला दु:खी करु शकत नाही. सुख-दु:खाच्या क्षणीही भक्त सहज अवस्था धारण करुन राहतो.

संत महापुरुषांचे विचार ऐकून ते केवळ बोलण्यापुरतेच मर्यादित रहायचे नाही ते विचार जीवनात आल्यावरच खऱ्या अर्थाने सार्थक मानले जातील. पूर्ण परमात्म्याची प्रत्येक कृती ही पूर्णच असते. ब्रह्मज्ञानाच्या जाणीवेने जीवनातील सुखदु:खाच्या प्रसंगातही मनुष्य कृतज्ञतेचाच भाव मनात ठेवतो. सत्संगामध्ये येऊन कधीही कुणाची कमतरता पाहू नये, आपण आपल्यात उत्तम भावनांची, गुणांची वाढ करायची आहे. मन चंचल आहे. ते सारखे इकडेतिकडे धावत असते. पण विवेक बुध्दी, चेतनता त्याला लगाम घालते. नदी वाहत असताना अडथळे मध्ये येतातच पण ती अडथळ्यांच्या अजूबाजूने वाट काढत पुढे जात राहते. त्या अडथळ्यांना क्रोधाने नव्हे; तर नम्रतेने पार करायचे आहे. सत्संगातले बोल हे अमृताप्रमाणेच असतात म्हणून संतांची वचनं केवळ श्रवण न करता जर मनाने श्रवण केली तर मन सदैव आनंदी राहील. सर्वत्र शांती स्थापित करील.

अलीकडे विश्वशांतीच्या घोषणा दिल्या जात आहेत. शांती स्थापन करण्यावरुनही मतभेद. त्यातूनही अशांतीच निर्माण केली जात आहे. एकदा काही कुत्रे एकत्र आले त्यांनी ठरवलं, की आपापसात भांडायचं नाही. एकमेकांशी प्रेमाने वागायचे सर्वांनी मिळूनमिसळून रहायचे, वाटून खायचे. या प्रमाणे ठरलं. तेव्हढ्यात आकाशातून एक घार उडत असताना तिच्या तोंडातून मांसाचा तुकडा कुत्र्यांच्या मध्ये पडला. तो तुकडा पाहताक्षणी सारे शांतीच्या गोष्टी विसरुन गेले. तुकडा मिळवण्यासाठी एकमेकांवर तुटून पडले. भुंकायला लागले, चावायला लागले. थोडक्यात, केवळ चर्चा करुन थांबायचे नाही तर कशीही परिस्थिती आली तर क्षुद्र मतभेद, स्वार्थीपणाबाजूला सारुन संतवचनावर दृढ रहायचे आहे.

साध संगत जी धन निरंकार!

# दादाला विचारु या..!

प्रश्न :- सदाचारी गृहस्थ आणि गुरुभक्त यात काय फरक आहे ?

उत्तर :-जगामध्ये सदाचारी, प्रामाणिक आणि नीतिमत्तेचं पालन करणारे पुष्कळ लोक आहेत; परंतु प्रत्येक सदाचारी हा गुरुभक्त असतोच असे नाही. मात्र गुरुभक्त हा सद्गुरुच्या कृपेने सदाचारी असतोच आणि दैवी गुणांची जोपासना करणाराही असतो. प्रत्येक कर्माचा कर्ता सद्गुरु निरंकार हाच आहे असे गुरुभक्त मानत असतो. त्यामुळे सत्कर्माचा त्याला अभिमान नसतो. सदाचारी गृहस्थाला सत्कृत्याचा अभिमान किंवा कर्ताभाव येऊ शकतो. गुरुभक्त हा नम्र, मधुर बोलणारा, प्रेमळ हृदयाचा असतो. त्याचा स्वत:च्या मनावर पूर्ण संयम असतो. आत्मिक रुपाने तो बलवान असतो. सुख दु:खाच्या प्रसंगी तो डळमळत नाही. सहजावस्थेत राहतो. सुख-दु:ख, मान-अपमान त्याला समान वाटतात. सदाचारी हा कितीही कर्मठ असला तरी दोघांच्या तुलनेत गुरुभक्त हा वरच्या श्रेणीतच असतो. सदाचारी व्यक्तीने कितीही दान-पुण्य केले, कितीही पूजा-पाठ केल्या तरी तो मुक्तीचा अधिकारी ठरत नाही. गुरुभक्त हा जिवंतपणीच मुक्त असतो.

❖❖❖❖❖❖

प्रश्न :- ईश्वराची ओळख आणि ईश्वराची अनुभूती यात काय फरक आहे ?

उत्तर :- ओळख म्हणजे एखाद्या वस्तूविषयीची माहिती आणि अनुभूती हा जाणिवेचा भाग आहे. पाणी या वस्तूची ओळख होणे आणि तहान भागवणे यात जेवढे अंतर आहे तेवढेच या दोन्ही शब्दात अंतर आहे. परमात्म्याची किंवा ईश्वराची ओळख झाल्याशिवाय आपण त्याचे ध्यान-अनुसंधान किंवा स्मरण करु शकत नाही. म्हणून आधी ओळख होणे महत्त्वाचे ! त्यानंतरच ध्यान-स्मरणाने अनुभूती येते. साखर या वस्तू विषयी आपण वाचलेलं किंवा ऐकलेलं असेल; परंतु जेव्हा दुकानातून साखर विकत आणून ती दाखवली तर ती झाली ओळख आणि त्यातील चमचाभर तोंडात टाकून ती चाखून पाहणं ही झाली अनुभूती. तशी ईश्वराबाबतची माहिती किंवा वर्णन धर्मग्रंथात असते परंतु सद्गुरु जेव्हा माया-ब्रह्म वेगळं करुन दाखवतात म्हणजे ब्रह्मज्ञान देतात तेव्हा त्याला 'ईश्वराची ओळख' असे म्हणता येईल आणि अशा या ईश्वराचं नित्य ध्यान-स्मरण-अनुसंधान करुन ती आनंदाची अवस्था अनुभवास येईल त्याला 'ईश्वराची अनुभूती' म्हणतात.

❖❖❖❖❖❖

# शब्दकोडे १९१

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )



## आडवे शब्द

१. ख्रिश्चन बांधवांचा सण
५. एक सेंटीमीटर म्हणजे किती मिलीमीटर ?
६. जम्मू काश्मीर राज्याचा राजधानी
८. मुख्य पुरुषार्थ कशास म्हटले आहे ?
९. हे सूर्याभोवती फिरतात (देह/ग्रह)
१०. बारशाच्या दिवशी हे ठेवले जाते
१२. रशियात राहणारा तो ....
१३. सेवा केल्याने तन-....-धनाचा अभिमान दूर होतो
१५. पाकिस्तानचे एक शहर
१७. भारताच्या राष्ट्रीयगाणामध्ये दोन नद्यांची नावे येतात : .... आणि यमुना
१८. स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर .... लॉर्ड माउंटबेटन होते

## उभे शब्द

१. जगात कोणत्या धर्माचे अनुयायी सर्वात जास्त आहेत ?
२. इंग्रजीमध्ये आई
३. ....जून, १६७४ रोजी शिवरायांचा राज्याभिषेक झाला
४. पक्ष याच्या विरुध्द
६. 'शालीमार बाग' कुठे आहे ?
७. श्रीगणेशाचे एक नाव
८. कोणता सण इस्लाम धर्मीयांसाठी वर्षाचा आनंद मानतात ?
११. जंगलाचा राजा सिंह (समानार्थी शब्द)
१४. माद्रीपुत्र, सहदेवचा भाऊ
१६. भारताचा शेजारी देश ज्याची राजधानी बिजींग आहे

उत्तरे इतरत्र

# हसा मुलांनो हसा

जाडूबाई - डॉक्टर, माझं वजन खूप वाढलय, ते कसं कमी करु ?

डॉक्टर - मान डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे दोन-दोन वेळा फिरवायची.

जाडूबाई - कधी ? पहाटे की संध्याकाळी ?

डॉक्टर - नाही... कोणी खायला विचारल्यावर.

एका बिल्डींगमध्ये राहणाऱ्या सात शेजारणींमध्ये भांडण पेटले, प्रकरण कोर्टात गेले. सुनावणीच्या वेळी सगळ्याच स्त्रिया जजला आपले म्हणणे ऐकवण्यासाठी एकाच वेळी गलका करु लागल्या. ऑर्डर ऑर्डर म्हणत न्यायाधीशांनी बऱ्याच वेळा टेबलावर हातोडा आपटला तेव्हा कोठे शांतता पसरली. नंतर न्यायाधीशांनी सांगितले, वयाने जेष्ठ असणाऱ्या स्त्रीने म्हणणे प्रथम मांडावे. मग काय ती केस उभीच राहिली नाही!

पहिला वार्ताहार - काल आमच्याकडे वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे सगळी झाडं मुळासकट उपटून निघाली.

दुसरा वार्ताहर - अरे बापरे! मग खूपच जीवितहानी झाली असेल!

पहिला वार्ताहार - नाही, सगळी झाडं कुंडीतली असल्याने जीवित हानी झाली नाही.

विनोद आणि वनिता हॉटेलात गेली होती. वनिताला पिझ्झा खावासा वाटला. वेटरने दोघांपुढेही एकेक पिझ्झा आणून ठेवला. विनोदने आपल्या पिझ्झाचे आठ तुकडे करुन घेतले.

वनिताला पिझ्झाचे किती तुकडे करु असे विचारताच ती म्हणाली, माझ्या पिझ्झाचे आठ नको, चार तुकडे कर, मी सध्या डाएट करते आहे. आठ तुकडे जास्त होतील चारच कर!

दोन मित्र बोलत असतात.

चंदू - गुगलविषयी तुला काय माहिती आहे ?

नंदू - हेच की ५० टक्के लोक गुगलचा वापर सर्च इंजिन म्हणून करतात आणि उर्वरित ५० टक्के लोकं इंटरनेट चालू आहे की नाही, हे तपासण्यासाठी.

एक चिमणी : (शेतात दाणे खात असताना) अगं पळ लवकर, तिथे बघ माणूस उभा आहे.
दुसरी चिमणी : नाही गं, बुजगावणं आहे ते !
पहिली चिमणी : तुला कसं कळलं ?
दुसरी चिमणी : त्याच्या हातात मोबाईल नाहीये.

छोटू : दादा रत्नागिरीच्या आंब्याला 'हापूस' हे नाव कसे पडले रे ?
दादा : एकदा रत्नागिरीला धुळीचं वादळ आलं. आंब्याच्या सगळ्या झाडांवर धुळीचे थर बसले. जेव्हा मजूर आंबे काढून पेट्यात भरत होते तेव्हा मालक मजुरांना म्हणायचे, 'हा पूस' 'हा पूस' प्रत्येक आंबा पुसण्यासाठी ते असं बोलत होते. तेव्हापासून रत्नागिरीच्या आंब्यांना 'हापूस' आंबा म्हणतात.

बेरोजगार व्यक्ती : मालक, तुमची जाहिरात वाचून मी तुमच्याकडे कामाला आलो आहे.
मालक : तुला माझी अट माहीत आहे ना ? तुला पगार न देता फक्त दोन टाईम जेवण मिळेल, चालेल ना ?
व्यक्ती : होय, मालक मला मान्य आहे.पण मला काय काय करायचं आहे ?
मालक : रोज गुरुद्वारात जायचं तिथे दोन टाईम मोफत लंगर (भोजन) दिलं जात. तेव्हा तू रोज दोन माणसांचं भोजन घेऊन यायचं. एक तुझ्यासाठी आणि माझ्यासाठी, कळले ?



बाळू - स्त्रियामंगळसूत्र घालतात, कुंकू लावतात. त्यामुळे लक्षात येतं की त्यांचं लग्न झालयं. पण, विवाहित पुरुष कसा ओळखायचा रे ?
बंटी - असे सोप्पंय रे विवाहित पुरुष ऑफिसला जाताना जेवणाचा डबा घेऊन जातात आणि संध्याकाळी घरी जाताना भाजीपाला नेतात!

शिक्षक : बाळ्या, तू सांग बरं, एका शेतात शंभर मेंढ्या बसलेल्या आहेत. त्यापैकी पन्नास मेंढ्या उठून गेल्या तर किती मेंढ्या शिल्लक राहिल्या ?
बाळ्या : एकपण नाही.
शिक्षक : काय रे तुला एवढं सोपं गणित येत नाही ?
बाळ्या : मला येतं... पण मेंढरांना कुठं येतं गणित ? एक उठलं की सगळी एकामागोमाग जातात.

# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. सुंदरवनात बंडू नावाचा एक वृध्द ससा रहात होता. तो खूप विद्वान व बुध्दीमान होता. जंगलातील प्राणी नेहमी त्याच्याकडून सल्ला घेत असत.

बंडू सशाने वादविवादामध्ये सुरेल कोकीळा व विद्वान मैना यांना पण हरवले होते. यामुळे जंगलचा राजा सिंह पण त्याचा आदर करत असे. हळूहळू त्याला त्याच्या विद्वत्तेचा अहंकार झाला होता.


एक दिवस तो अन्नाच्या शोधात निघाला. पाऊस पडत होता. रस्त्याच्या कडेला काळ्या जांभळांनी भरलेली झाडं होती. मोठे मोठे काळे जांभळं बघून बंडू सशाच्या तोंडाला पाणी सुटले.
एका मोठ्याशा जांभळाच्या झाडाखाली जाऊन त्याने वर पाहिले तर त्याला पोपटांचा थवा जांभळं खाताना दिसला. बंडु सशाने खालुनच आवाज दिला, माझ्या प्रिय मित्रांनो माझ्यासाठी पण थोडे जांभळं खाली टाका.
त्या पोपटांच्या थव्यात मिट्ठू नावाचा एक पोपट खूप खोडकर होता. तो झाडावरुनच बोलला, आजोबा आधी मला सांगा तुम्ही गरम जांभळं खाणार की थंड ?
बंडु ससा हैराण होऊन म्हणाला, "जांभळं कधी गरम असतात का ? माझी थट्टा नका करु. मला थोडे जांभळं तोडून द्या."

मिट्टू बोलला, "अहो आजोबा, तुम्ही एवढे महान विद्वान असून देखील तुम्हाला माहित नाही, जांभळं गरम असतात की थंड." तुम्ही आधी हे सांगा, की तुम्हाला कशी जांभळं पाहीजेत ? ते समजल्याशिवाय मी कशी जांभळं देऊ शकतो तुम्हाला ?
सशाला काहीच समजेना, की जांभळं गरम कशी असतील. पण त्याला ते रहस्य जाणून घ्यायचे होते म्हणून तो म्हणाला, "बाळा, तू मला गरमच दे. थंड जांभळं मी खूप खाल्ली आहेत."
हे ऐकून छोट्या मिट्टूने झाडाची एक फांदी जोरात हलवली. पिकलेली भरपूर जांभळं जमिनीवर पडली. बंडु ससा धुळीत पडलेली जांभळं फुकून फूकून वेचू लागला. हे पाहून छोट्या मिट्टूने विचारले, "काय आजोबा, जांभळं खुप गरम आहेत ना ?"

ससा म्हणाला, अरे बाळा ? हे तर साधारण ठंडच जांभळं आहेत.
छोट्या मिट्ठू पोपटाने आश्चर्याने विचारले "काय, थंड आहेत ? मग तुम्ही फुकून फुकून का खाताय ? अशाप्रकारे फक्त गरम वस्तुच खाल्ली जातात."
मिट्ठू पोपटाच्या बोलण्याचे रहस्य खंडु सशाच्या लक्षात आले आणि तो खजील झाला. विद्वान बंडु ससा छोट्याशा गोष्टीने पोपटासमोर हारल्यामुळे त्याचा अभिमान निघून गेला होता.
?
त्यादिवशी बंडू सशाचा अभिमान धुळीस मिळाला, कारण त्याला कळून चुकले, की अहंकार बुध्दीमत्तेचा शेवट करते.

# पैज

एक म्हातारी होती. ती अत्यंत चतुर होती. ती मुंबईतल्या एका मोठ्या नामांकित बँकेमध्ये आली. ती सरळ मॅनेजरच्या कॅबिनमध्ये गेली आणि म्हणाली, "मला या बँकेत काही पैसे जमा करायचे आहेत." मॅनेजरने विचारले, "किती रुपये आहेत?" "असतील विस एक लाख!" म्हातारी म्हणाली.

"वा फारच छान! आपल्याकडे बरेच पैसे आहेत तर! तुम्ही काय करता?"

"काही खास नाही. बस पैजा लावते."

"काय? पैजा लावून एवढे पैसे जमवले आहेत? कमालच आहे...!"

"कमाल काही नाही रे लेकरा! मी आता देखील एक लाख रुपयाची पैज लावू शकते की... तू डोक्यावर विग घातला आहेस!"

"अहो आजीबाई, मी तर अजून तरुण आहे.

माझ्या डोक्यावर खरे खरे केस आहेत. मी विग नाही वापरत"

"मग पैज का नाही लावत?" म्हातारी म्हणाली.

मॅनेजरने विचार केला, म्हातारी जर एक लाख रुपये घालवायलाच आली आहे, तर मग याचा फायदा आपण का उठवू नये? आपण तर विग वापरतच नाही. हे तर खणखणीत सत्य आहे. मॅनेजर एक लाख रुपयाची पैज लावण्यासाठी तयार झाला.

म्हातारी म्हणाली, "मामला एक लाख रुपयाचा आहे, म्हणून उद्या सकाळी ठीक दहा वाजता माझ्या वकीलांबरोबर येईन आणि त्यांच्या समोरच पैजेचा निकाल लागेल." मॅनेजर आनंदाने म्हणाला, "ठीक आहे, ठरलं तर...!"

त्या दिवशी मॅनेजरला रात्रभर झोप लागली नाही. सारखं कसं एक लाख रुपये आणि म्हातारी या भोवतीच त्याचं मन आणि विचार घिरट्या घालत होते.

ठीक सकाळी दहा वाजता वकीलांबरोबर म्हातारी मॅनेजरच्या केबिनमध्ये आली आणि म्हणाली, "काय साहेब! तुम्ही तयार आहात ना?" मॅनेजर म्हणाला, "हो तर..."

"वकील साहेब पण येथे आहेत आणि बाब एक लाख रुपयांची आहे. म्हणून मी खातरजमा करु इच्छिते, की तुम्ही विग लावला आहे. यासाठी मी फक्त माझ्या हातांनी तुमचे केस हलकेसे ओढून पाहू इच्छिते." मॅनेजर साहेबांनी क्षणभर विचार केला आणि होकार दिला. म्हातारी मॅनेजरच्या जवळ गेली आणि हळूहळू मॅनेजरचे केस ओढू लागली. त्याच वेळेस अचानक वकील साहेब आपलं डोकं भिंतीवर आपटायला लागले. तेव्हा मॅनेजरने विचारले, "वकील साहेब तुम्हाला काय झालं?"

यावर म्हातारी म्हणाली, "काही नाही साहेब! यांना मोठा धक्का बसला आहे. मी यांच्याशी पाच लाख रुपयांची पैज लावली होती, की आज सकाळी दहा वाजता शहरातल्या सर्वात मोठ्या अन् नामांकित बँकेच्या मॅनेजरचे केस उपटण्याचा प्रयत्न करेन! तेच येथे सर्व खरे घडताना त्यांना बघवत नाही. दुसरं काय?"

मॅनेजरने कपाळावर हात मारुन घेतला.

- कृष्णा निकोडे, गडचिरोली

## १६ सप्टेंबर

# ओझोन दिवस

दरवर्षी १६ सप्टेंबर हा दिवस 'ओझोन दिवस' म्हणून जगभर साजरा होतो. ओझोनचा थर हा पृथ्वीवासीयांसाठी एक मोठं वरदानच आहे. या ओझोनचे महत्त्व सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवण्यासाठी व या थराच्या संवर्धनासाठी हा दिवस साजरा करण्यात येतो. ओझोनचा थर, पृथ्वीच्या वातावरणाचा दुसरा स्तर. ह्या ओझोनच्या थराला ओझोनोस्फियर देखील म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून साधारण १५ ते ३० किलोमीटर वर हा थर आहे.

आपल्या पृथ्वीवरील जीवसृष्टीला सुरक्षित ठेवण्यात या ओझोनच्या थराचा मोठा वाटा आहे. सूर्य, पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी जितका पोषक आहे; तितकाच तो घातक देखील आहे. सूर्यापासून येणारी मध्यम अति-नील किरणे माणसामध्ये व इतर प्राण्यांमध्ये विविध आजार उत्पन्न करु शकतात. अशा या मध्यम अति-नील किरणांना शोषून घेत ओझोन आपली रक्षा करतो. पण अशा या आपल्या सुरक्षा कवचाला छिद्र पाडण्याचे काम स्वतः मानवच करतोय. गेल्या ३० ते ४० वर्षात दोन्ही ध्रुवांवर ओझोनच्या थराला मोठी छिद्र पडलेली आहेत. या छिद्रांना 'ओझोन होल' असेही म्हणतात. नासाच्या 'ओझोन होल वॉच' तर्फे दररोज ओझोनवर लक्ष ठेवले जाते. या छिद्रांचा आकार वर्षानुवर्षे वाढतच चाललेला आहे.

१९८५ मध्ये ओझोनचे प्रमाण फारच कमी झाले होते, पण त्यानंतर परत १९८६ मध्ये ते वाढले. ओझोनचे प्रमाण सतत बदलत राहते.

वातावरणातल्या वरच्या थरातल्या ऑक्सिजन रेणूंचे ($O_2$) विभाजन सूर्यकिरणातील अति-नील लहरी करतात. त्यातून ऑक्सिजनचे अणू (O) तयार होतात. हे ऑक्सिजनचे एकल अणू (O) इतर ऑक्सिजन रेणूंशी ($O_2$) जुळून ओझोनचा ($O_3$) एक रेणू तयार करतात. हे ओझोनचे रेणू आणखी अति-नील लहरी शोषून पुन्हा विभाजित होतात, तसेच परत इतर

ऑक्सिजन रेणूंशी जुळून पुन्हा ओझोनमध्ये रुपांतरित होतात. ओझोनने शोधलेल्या अति-नील किरणांमुळे स्ट्रॅटोस्फीयरचे तापमान उंचीप्रमाणे वाढत जाते. ही प्रक्रिया सतत चालू असते. त्यामुळे कधी ओझोनचे प्रमाण कमी होते तर कधी वाढते. ओझोनचे रेणू बहुतेक विषुववृत्त पट्टयावर तयार होतात. कारण तिथे सौर किरणांची तीव्रता जास्त असते.

गेल्या काही वर्षात मानवनिर्मित प्रक्रियांमुळे ध्रुवीय प्रदेशांवरचा ओझोनचा थर खूप पातळ झाला आहे. क्लोरोफ्लोरोकार्बन्स आणि ब्रोमोफ्लोरोकार्बन्स ही रसायने ओझोन थर पातळ करण्यात कारणीभूत आहेत.

क्लोरोफ्लोरोकार्बन आणि ब्रोमोफ्लोरोकार्बन्सच्या रेणूमध्ये कार्बन, क्लोरीन, ब्रोमिन आणि फ्लोरिनचे घटक असतात. हे घटक साधारण २ ते ५ वर्षात स्ट्रॅटोस्फियर पर्यंत पोहोचू शकतात. जेव्हा क्लोरीन आणि ब्रोमिनचे अणू स्ट्रॅटोस्फियरमध्ये ओझोनच्या संपर्कात येतात तेव्हा ते ओझोनचे रेणू नष्ट करतात. एक क्लोरीनचा अणू एक लाख ओझोन रेणू नष्ट करु शकतो. ते ऑक्सिनच्या रेणूंना एकत्रित येऊन ओझोन रेणुंमध्ये रुपांतरित होऊ देत नाहीत. त्यामुळे ओझोन नैसर्गिकरित्या तयार होण्यापेक्षा लवकर नष्ट होऊ शकतो.

उत्तर व दक्षिण ध्रुवावर पृथ्वीच्या सुमारे ५ टक्के पृष्ठभागाएवढी मोठी 'ओझोन होल' दिसून आली आहेत. ओझोन होलचे दुष्परिणाम पृथ्वीवर विविध रुपात दिसून येतात. उत्तर ध्रुवावर ३० टक्के तर दक्षिण ध्रुवावर ६० टक्के ओझोनचे प्रमाण कमी होत असल्याचा निष्कर्ष आहे. त्याचा थेट परिणाम ध्रुवावरील बर्फ वितळण्यावर होत असून त्यामुळे तेथील सजीव धोक्यात आले आहेत. बर्फ वितळल्यामुळे समुद्राची पातळीही वाढत असून त्यामुळे जगभरातील भूभाग कमी होत आहे. वैद्यकीय संशोधनातून असे सिध्द झाले आहे, की सूर्यापासून थेट येणाऱ्या अतिनील व किरणांमुळे आपल्याला त्वचेचा कर्करोग होतो. त्याशिवाय मोतीबिंदू व डोळ्यांचे इतर विकार सुध्दा होऊ शकतात.

स्ट्रॅटोस्फीयर मधील ओझोनचे प्रमाण घटत असले तरी औद्योगिक प्रदुषणामुळे जमिनीवरील ओझोनचे प्रमाण वाढू लागले आहे. ज्या भागात हवेत कोळसा जाळला जातो, वाहने व उद्योग जास्त आहेत तेथे हायड्रोकार्बन्स आणि नायट्रोजन-ऑक्साईडच्या रेणुंचे प्रमाण जास्त असते या रेणुंवर सूर्यकिरणांची प्रक्रिया होऊन ओझोन वायू तयार होतो. हा वायू शेतीच्या संपर्कात आला तर तो धोकादायक ठरु शकतो. त्यामुळे पिकांची प्रकाश संश्लेषण प्रक्रिया मंदावते आणि उत्पन्न कमी होते. माणसांमध्ये ओझोनमुळे श्वसनाचे विकार उद्‌भवून फुप्फुसावर परिणाम होऊन दमा व हृदयरोग होण्याचीही शक्यता असते. जमिनीवर असलेल्या ओझोनमुळे ग्रीनहाऊसचा परिणाम वाढून जागतिक सरासरी तापमानसुध्दा वाढत चालले आहे.

❖❖❖

कथा

# तीन दागिने

ठाकूरदास नावाचे एक गृहस्थ कलकत्त्यामध्ये रहात होते. पत्नी आणि एकुलता एक मुलगा एवढंच कुटुंब होते; पण कुटुंबाच पालन-पोषणदेखील नीट होत नव्हते. पुढे मेदिनीपूर जिल्ह्यात त्यांना दोन रुपये महिना पगाराची नोकरी मिळाली. कालांतराने त्यांचा मृत्यू झाला. पत्नीच्या खांद्यावर कुटुंबाची जबाबदारी आली. तिने दिवसभर लोकांचे घरकाम करुन आपल्या मुलाला चांगले शिक्षण दिले. संस्कार दिले. एके दिवशी तो मुलगा आईचे पाय चेपत असताना आईला म्हणाला, "आई, मी शिकून खूप मोठा होणार आणि तुझी खूप खूप सेवा करणार, तुझ्यासाठी चांगले दागिने बनवणार, तुला खूप आनंदात ठेवणार."

आई म्हणाली, "बेटा, तू माझी सेवा करणार, मला सुखात ठेवणार याची मला खात्री आहे. पण मला मात्र तीन दागिने तुझ्याकडून हवे आहेत."

मुलगा म्हणाला, "आई, तुला कोणते दागिने

हवे आहेत ?"

आई म्हणाली, "बेटा वेळ आल्यावर तुला सांगेन."

काही कालावधी मध्ये निघून गेला. मुलगा शिकून मोठा विद्वान पंडित बनला. तेव्हा त्याने आपल्या मातेची मागणी पूर्ण करण्याची इच्छा बोलून दाखवली. त्याने आईला आठवण करुन देत विचारले, "आई, तू म्हणाली होतीस ना, तुला माझ्याकडून तीन दागिने हवे आहेत म्हणून ? सांग ना कोणते दागिने हवे आहेत ?"

आई म्हणाली, "पहिला दागिना म्हणजे या गावात शाळा नाही. मुलांना शिक्षणासाठी लांब-लांब जावे लागते. तेव्हा गावात शाळा काढावी. दुसरा दागिना म्हणजे गावात दवाखाना नाही. एक दवाखाना गावात असावा. तिसरा दागिना म्हणजे गरीब मुलांना शिक्षणाची आणि राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून एक छात्रालय असावं."

मुलगा आईच्या मागण्या ऐकून भारावून गेला. आईचा त्याला खूप अभिमान वाटला. आईच्या चरणी नतमस्तक होत आईला त्याने वचन दिलं, 'आई तुझ्या आशीर्वादाने या तिन्ही गोष्टी नक्की करेन.'

पुढे त्या मुलाने गावात शाळा, छात्रालय आणि दवाखाना उघडलाच पण स्त्री शिक्षणासाठी आणि विधवांसाठी आश्रमही स्थापन केले. असा हा मातृभक्त, देशभक्त मुलगा म्हणजे पं. ईश्वरचंद्र विद्यासागर हे होत. त्यांचा जन्म २६ सप्टेंबर १८२० रोजी प. बंगालमध्ये झाला.

❖❖❖

कविता

# बालदिन

मानवी जीवनामधली
बाल अवस्था छान
दोषरहित निर्वैर सदैव
निर्मळ गंगेसमान ।।धृ।।

वैर द्वेश ना कधी कुणाशी
नाही कुणाची घृणा
सारे माझे मी सर्वांचा
उच्च अशी भावना
गर्व कशाचा नाही
ना किंचित अभिमान ।।१।।

लाड करावे ज्याने त्याने
प्रेमे उचलून घ्यावे
दुःख क्लेश ना कसली चिंता
नेहमी हसत रहावे
रुसवा राग हट्ट क्षणाचा
पुरवून ठेवती मान ।।२।।

स्वैर आणि स्वच्छंद अशी
आहे बाल अवस्था
हवी हवी वाटते आजही
जरी आली जरा अवस्था
विसरु कसा सुरेशा
ते सुंदर जीवनमान ।।३।।

- सुरेश तिर्लोटकर

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

सुहानी मांडे

तनिष्ठा थोरात

आकाश गोधडे

अग्रता कुरील

आरुष सोनिस

व्याप्ती भुजबळ

मधुर्ता भुजबळ

कनिका सुर्वे

भक्ती पाटील

अक्षरा आर्दद

गार्गी पाटील

समर माणगावकर

वैष्णवी गवई



उनती भोसले

सान्वी पवार

प्रगती चवाण

अमनदीप चमन

अवनीत लोकरे

लिखीत लोकरे

हर्षित घाटगे



विहंगा मुकुंद

अनय कारंडे

अश्मित लांडे

जिज्ञासा जाधव

सप्रेम राणे

सुनीता बंडबे

सिमरन चौगले

रुचिरा भागवत

# चिखलदरा व लासूर

पर्यटनाच्या क्षेत्रात मागे असलेला भाग म्हणजे विदर्भ!

या विदर्भातील एकमेव हिल स्टेशन म्हणजे 'चिखलदरा'. अमरावतीपासून हे ठिकाण अडीच तीन तासांच्या अंतरावर आहे. थेट महाभारतातील किचक वधाचे स्थळ असलेल्या या हिरव्यागार गिरिस्थानाची मजा वर्षभरात केव्हाही लुटता येते. हैद्राबाद पलटणीतील कॅप्टन रॉबिन्सन याला सन १९२३ मध्ये या ठिकाणाचा शोध लागला असं सांगितलं जातं. विदर्भाच्या कडक उन्हावर इथल्या गारेगार हवेचा उतारा गोऱ्या साहेबाला चांगलाच भावला आणि चिखलदरा लोकप्रिय झालं. आज चिखलदरा ओळखलं जातं ते महाराष्ट्रातील एकमेव कॉफी प्लँटेशनसाठी. सनराइज आणि सनसेट पॉइंट, भीमकुंड, वैराट पॉइंट, हरिकेन पॉइंट, प्रॉस्पेट पॉइंट याबरोबरच आवर्जून पाहण्यासारखं ठिकाण म्हणजे गाविलगड हा १५व्या शतकातला किल्ला. फतेह दरवाजा, दिल्ली दरवाजा, किचकदरा दरवाजा, बारा दरवाजा अशी या किल्ल्यातली ऐतिहासिक प्रवेशद्वारं आजही पाहायला मिळतात. चिखलदऱ्याला लागूनच मेळघाटचे जंगल आहे. इथे महाराष्ट्रातला पहिला प्रोजेक्ट टायगर राबवण्यात आला. सिपना नदीकाठच्या सेमाडोह या लहानशा गावात वनखात्याची निवास व्यवस्था आहे. भोवतालच्या जंगलाचा परिचय करुन देणारं एक म्युझियम आहे. इथे राहून मेळघाटच्या वनसंपदेचा आनंद पुरेपूर घेता येतो. मेळघाट टायगर रिझर्वमध्ये नरनाळा हा



१०व्या शतकातला किल्लाही येतो. दीड चौरस किलोमीटरच्या परिसरात पसरलेल्या या किल्ल्यावर ३६० टेहळणी मनोरे, सहा महाद्वारे आणि वीस लहान दरवाजे आहेत. महाकाली मंदिर, पेशवे महाल, रानी महल, बारादरी अशा पुरातन वास्तुंचे अवशेष या किल्ल्याचा इतिहास जपत उभे आहेत. हा किल्ला जरी मेळघाट वनक्षेत्रात येत असला तरी अकोल्याहून जाणं (६६ कि.मी.) सोयीचं पडतं. इथून श्री गजानन महाराजांचं शेगाव फक्त ८१ किलो मीटरवर आहे त्यामुळे देवदर्शनाचं पुण्यही पदरात पाडता येतं.

विदर्भवारीत आवर्जून पाहावं असं एक मंदिर दर्यापूर तालुक्यातील लासूर येथे आहे. पूर्णा नदीकाठी वसलेल्या लासूर गावातील हे यादवकालीन मंदिर अनेक वर्ष मातीखाली गाडलेलं होते. उत्खनन करुन सगळं मंदिर बाहर काढण्यात आलं. या मंदिराचा गोलाकार सभामंडप बारा कोरीव खांबांवर तोलून धरलेला आहे. या स्तंभावर नक्षीकामाबरोबरच गरुड, नरसिंह, गणपती यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिरावर शिखर वा कळस नाही. सभामंडपाचे गोलाकार छत उघडे आहे, त्यामुळे थेट सूर्यप्रकाश आत येण्यासाठी अशी रचना केली असावी असं वाटतं. मंदिरात एक मुख्य गाभारा आणि त्याच्या दोन बाजूंना दोन लहान गाभारे आहेत. मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग आहे, मात्र छोट्या गाभाऱ्यातील मूर्ती बेपत्ता आहेत. मंदिराच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूस दशावतार, नरसिंह, लक्ष्मी, भैरव, हिरण्यकश्यपू वध असं कोरीव काम पाहायला मिळतं.

महिमापुर गावात (अमरावतीपासून ५० कि.मी.) चक्क सात मजल्यांची पायऱ्यांची विहीर आहे. सुमारे सातशे-आठशे वर्षांपूर्वी सैन्याच्या पडावासाठी बांधलेली ही विहीर १०० फूट खोल आणि २५० चौ.फूट रुंद आहे. या विहिरीच्या आत एक दालन, काही कोनाडे आणि महिमाईचं देऊळ आहे.

❖❖❖

# आस्तिक आणि नास्तिक

इंग्रजीत एक कहाणी आहे 'बिलीव्हर्स ॲण्ड नॉन बिलीव्हर्स'. अर्थात आस्तिक आणि नास्तिक. नास्तिक ईश्वराला मानत नाहीत. तो आपल्या भूमिकेवर ठाम असतो तो म्हणतो या सृष्टीची रचना आपोआप झालेली आहे. हवामानात बदल, भूकंप इ. हालचाली, घटना घडल्या आणि ही सृष्टी निर्माण झाली. अशाच विचारसरणीचा एक पिता आपल्या मुलालाही नेहमी हेच सांगत असतो, की ईश्वर वगैरे काही नाही. या सृष्टीची रचनादेखील आपोआपच झालेली आहे.

एके दिवशी त्या मुलाचे वडील नेहमीप्रमाणे घरी आले तेव्हा त्यांनी भिंतीवर स्वत:चे पेंट केलेलं चित्र चिकटवलेलं पाहिलं. त्यांनी मुलाला विचारलं, 'बेटा, हे चित्र कुणी काढलं?' त्यावर मुलगा म्हणाला, 'बाबा! तुम्हाला ठाऊक आहे ना, आज किती जोराचा वारा सुटला होता!' वडील म्हणाले, 'हो ठाऊक आहे.' मुलगा म्हणाला, 'खिडकी उघडी होती. वाऱ्याच्या झोताबरोबर एक ब्रश आला मग रंग आला त्यानंतर एक कागदही आला आणि तुमचं सुंदर चित्र आपोआप तयार झालं.'

वडील म्हणाले, 'बेटा! तू मला काय मूर्ख समजतोस का? तू अजून खूप लहान आहेस. खोटं काहीतरी सांगून मला मूर्ख बनवू पाहतोस? एवढं सुंदर चित्र आपोआप कसं तयार होईल?' त्यावर मुलगा विनम्रपणे म्हणाला, 'बाबा तुम्हीच तर सांगता ना, की ही सृष्टी, ही माणसं, या साऱ्या वस्तु आपोआप तयार झाल्या म्हणून! एवढ्या मोठ्या गोष्टी जर आपोआप तयार झाल्या असतील तर मग हे साधारणसं चित्र आपोआप का नाही तयार होऊ शकत?' या प्रश्नाचं उत्तर वडिलांकडे नव्हतं. त्यांनाही कळून चुकलं, की या सृष्टीचाही कुणीतरी निर्माता असणार आणि तेही नास्तिकाचे आस्तिक बनले. परमात्म्याचं अस्तित्व त्यांनी मान्य केलं. म्हणूनच या प्रभु-परमात्म्याला जाणण, याची ओळख करुन घेणं मानवासाठी फारच आवश्यक आहे.

❖❖❖

# पंडिता रमाबाई

दिनांक २३ एप्रिल १८५८ रोजी पहाटे मंगरुळ जवळील गंगामूळ या डोंगरावर पं. रमाबाईंचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे व आईचे नाव लक्ष्मीबाई. हे एक चित्पावन ब्राह्मण कुटुंब होते. आई-वडील दोघेही संस्कृत पारंगत होते. गंगामूळ येथील आश्रमात अनेक विद्यार्थी संस्कृत शिकण्यासाठी येत. हे डोंगरे कुटुंब भारतभर तीर्थयात्रा करीत फिरले. अनंतशास्त्र्यांनी आपल्या पत्नीला व मुलींनाही संस्कृत शिकवले म्हणून त्यांना फार छळ सहन करावा लागला.

मद्रासमध्ये आलेल्या दुष्काळाने रमाबाईंच्या आईवडिलांचा व थोरल्या बहिणीचाही बळी घेतला. या आपत्तीत रमाबाईंचा थोरला भाऊ श्रीनिवास आणि त्या स्वतः दोघेच वाचले. दोन्ही भावंडे पुराण सांगत, संस्कृतमध्ये व्याख्याने देत कलकत्त्यात पोहचले. तेथे त्यांच्या विद्वत्तेला दाद मिळाली. कलकत्ता विश्वविद्यालयातील पंडितांनी मोठ्या सन्मानाने युनिव्हर्सिटीत आमंत्रित करुन रमाबाईंना पंडिता सरस्वती असे बिरुद अर्पण केले.

पुढे रमाबाईंच्याही भावाचे निधन झाले. बाईंनी आपल्या भावाच्या मित्राशी विवाह केला. त्यांचे नाव बिपीन बिहारीदास मेधावी. हा आंतरजातीय विवाह असल्यामुळे त्या म्हणजे १८८० साली लोकमत फारच प्रक्षुब्ध झाले. विवाहानंतर १९ महिन्यांतच रमाबाईंच्या संसाराचा डाव उधळला. त्यांच्या पतीचे निधन झाले. बाईंना एक कन्या झाली. तिचे नाव मनोरमा.

समाजसुधारणेची प्रचंड आवड असणाऱ्या रमाबाईंनी महाराष्ट्रात येऊन पुण्या-मुंबईस 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. इतरत्रही म्हणजे ठाणे, अहमदनगर, सोलापूर येथेही त्यांनी या समाजाची स्थापना केली. इंग्रजी शिक्षणासाठी त्या इंग्लंडला गेल्या. तिथे परित्यक्त्या स्त्रियांसाठी होत असलेले काम पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्याचवेळी त्यांचे लक्ष ख्रिस्ताच्या धर्माने आकर्षित झाले.

ख्रिस्ताच्या सेवा, करुणा, त्याग, सहनशीलता, दया या धर्मगुणवैशिष्ट्यांनी त्या भारावून गेल्या. येशू ख्रिस्त ही धर्माच्या मांडवातील घोषणा नाही. त्याने वधस्तंभावर पत्करलेल्या हौतात्म्याचे जबरदस्त

(पान ३४ वर)

समर्थ दर्शन : भाग - ६८

# पैठणच्या ब्राह्मणांची परीक्षा

समर्थांच्या साधुत्वाची कीर्ती जेव्हा चहूकडे पसरली तेव्हा पैठणातील ब्राह्मणांनी विचार केला, की रामदासांची लोकं एवढी कीर्ती गातात ती खरी आहे, की उगाच ते पाहून यावे. पूर्वी त्यांनी येथे मेलेली घार उठवली होती. तेव्हा ते सामर्थ्य अद्याप आहे किंवा नाही हेही पाहावे. असे मनात येऊन पन्नास-साठ प्रमुख ब्राह्मण माहुलीस आले व त्यांनी शिवाजीमहाराजांना निरोप पाठवला की आम्ही असे असे पैठणचे ब्राह्मण रामदास स्वामींच्या भेटीकरिता आलो आहोत. तरी त्यांची व आपली भेट केव्हा होईल ते कळवावे. म्हणजे त्याप्रमाणे येऊ.

हा ब्राह्मणांचा आलेला निरोप महाराजांनी समर्थांना कळवला. तेव्हा समर्थ म्हणाले, "उत्तम आहे. पण त्यांना सामोरे जायला नको

काय ?"

शिवाजी महाराज म्हणाले, "होय, विद्वान ब्राह्मण आहेत. त्यांना सामोरे गेलेच पाहिजे. सायंकाळी संगमावर सामोरे जाण्याचे ठरविले आहे."

समर्थ म्हणाले, "ठीक आहे, आम्हीही आता शिकारीस चाललो आहोत. परस्पर आम्हीही संगमावरच येऊ."

हे ऐकून राजे आश्चर्यचकित होत म्हणाले, "हे काय ?"

"आम्हाला शिकारीचा नाद आहे, जाऊन येऊ चार घटका," असे म्हणून कल्याणस्वामींसह एका हातात गलोल घेऊन स्वारी डोंगरात गेली.

सायंकाळी शिवाजी महाराज मोठ्या इतमामाने माहुलीच्या संगमावर पैठणच्या ब्राह्मणांना आणण्याकरिता सामोरे गेले. तेथे बसायला गिरद्या घालून मोठा थाट केला होता. महाराजांनी सर्व ब्राह्मणांना साष्टांग नमस्कार घातला. सर्व मंडळी बसली.

क्षणभर कुलवृत्तांचे प्रश्न होत आहेत तोच कल्याणस्वामींसह समर्थांची स्वारीही येऊन दाखल झाली. डोईला जटाभार, पायी पादुका, अंगात मेखळा व हातात गलोल असे समर्थांचे ध्यान पाहून ब्राह्मणांना मोठे कौतुक वाटले. समर्थांनी येताच सर्व ब्राह्मणांना साष्टांग नमस्कार घातला व बैठकीवर बसले. मग ते म्हणाले, "आम्ही जरा शिकारीस गेलो होतो. त्यामुळे यायला थोडा उशीर लागला."

राजांनी प्रश्न केला, "अशी आज शिकार तरी कशाची केली ?"

समर्थ कल्याणस्वामींकडे पाहून म्हणाले, "दाखव रे आणलेली शिकार." असे म्हणताच कल्याणस्वामींच्या काखेला सुमारे दोन मण धान्य राहील अशी झोळी भरलेली होती. ती त्यांनी बैठकीवर आणून ओतली. तो तिच्यातून शेकडो मारुन आणलेल्या चिमण्यांची रास बाहेर पडली. हा प्रकार पाहून आलेल्या ब्राह्मणांना काय वाटले असेल हे सांगणे नकोच. शिवाजीमहाराजांचा चेहराही उतरला, परंतु आता पुढे काय चमत्कार होतो, तो पाहावा म्हणून स्वस्थ बसले. कित्येक उतावळे ब्राह्मण होते, ते आपापसात कुजबुजू लागले, "पाहता काय ? हे कसले साधू आणि कसले काय ? कपाळाला शेण फासा यांच्या."

त्यात कित्येक अनुभवी ब्राह्मण होते, ते त्यांना दाबून म्हणाले, "अहो पण थांबा जरा, ते नावाचे रामदास आहेत. थोडा वेळ जाऊ द्या तरी, नंतर बोला."

अशा स्थितीतच काही वेळ क्षेमकुशल प्रश्न झाले. "आपण येथपर्यंत आलात व दर्शन दिलेत फार संतोष झाला," असे समर्थांनी सर्वांना सांगितले.

नंतर राजांनी सर्व ब्राह्मणांना गावात येण्याविषयी विनंती केली. तेव्हा सर्व ब्राह्मण उठले आणि निघण्याची तयारी झाली.

इतक्यात सूर्य अस्तास जाऊन सायंकाळही झाली. तेव्हा समर्थ कल्याणांकडे पाहून म्हणाले, "इतका वेळ आपला खेळ झाला, आपण आपल्या घरी जाणार, तशीच ह्या चिमण्यांची पिल्लेही त्यांची वाट पाहात असतील. त्या करिता त्यांनाही जाऊ द्या आपापल्या कोठ्यात."

कल्याण म्हणाले, "पण ह्यांना कशा रवाना करु ?"

समर्थ म्हणाले, "ते गवत गोळा कर आणि त्याला दे आग लावून."

"आज्ञा" म्हणून कल्याणस्वामींनी लागलीच गवताचा ढीग गोळा केला व त्यात त्या मेलेल्या चिमण्या घालून त्याला आग लावून दिली. आग पेटताच त्यातील चिमण्या भराभर वर उडून निघून गेल्या. हा चमत्कार पाहून सारे ब्राह्मण चकीत झाले त्यांनी सर्वांनी उठून समर्थांचे पाय धरले.

"आम्ही आपली परीक्षा पाहण्याकरिता आलो होतो. ह्यास्तव अपराधावी क्षमा व्हावी." अशी ब्राह्मणांनी प्रार्थना केली.

त्यावर समर्थ हसून म्हणाले, "आपण भूदेव आहात, मी केवळ आपला दास, सामर्थ्य सर्व केवळ आपलेच. आपल्या परीक्षेला जाण्याचे सामर्थ्य कोणाचे ? श्रीरघुपती दासांचा अभिमान बाळगतात म्हणून अशा गोष्टी घडतात."

क्रमशः.....

## तेजस्विनी : पंडिता रमाबाई (पान ३१ वरुन)

आकर्षण कुठल्याही जाती धर्माच्या संवेदनशील सश्रध्द माणसाला आहे. म्हणून येशू ख्रिस्त हा केवळ ख्रिस्ती धर्मियांचाच नसून मानवतेवर श्रध्दा असणाऱ्या प्रत्येकाचाच तो आहे. या विश्वासाने दिनांक २९ सप्टेंबर १८८३ रोजी वॉन्टज येथील मतानुसारी चर्चमध्ये रमाबाईंनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्यांच्या बाप्तिस्म्याचा विधी कॅनन बटलर यांच्या हस्ते झाला.

११ मार्च १८८९ रोजी मुंबईस विल्सन कॉलेजजवळ चौपाटीवर एका भाड्याच्या ऐसपैस घरात शारदा सदनाची त्यांनी स्थापना केली. या सदनात पहिली खरीखुरी विधवा विद्यार्थिनी आली. ती म्हणजे महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या भावी पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे. त्या नंतर तीन महिन्यांतच या सदनात एकूण २२ विद्यार्थीनी आल्या.

त्यानंतर रमाबाईंनी पुण्याजवळ ३४ मैलांवर असणाऱ्या केडगावमध्ये १०० एकर जमीन घेतली. तेथे त्यांनी अबलांसाठी, महिलांसाठी, परित्यक्तांसाठी, सेवाकार्य सुरु केले. आजही तिथे पं.रमाबाईंच्या सेवाभावी मनोवृत्तीनेच समाजसेवा सुरु आहे. तिथे प्रवेशद्वाराच्या उजव्या हातालाच रमाबाईंची खोली आहे. त्या वापरत असलेल्या वस्तू उदा. टेबल, खुर्ची, पाण्याचा गडवा पाहायला मिळतो. अनेक जिज्ञासू केडगावला जाऊन रमाबाईंची खोली, केडगाव मुक्ती मिशनच्या आसपासचा परिसर पाहून आनंदित होतात.

दिनांक ५ एप्रिल १९२२ ला पं.रमाबाईंचा मृत्यू झाला.

❖❖❖

# सर्दी-पडसे

सर्दी-पडसे हा पावसाळ्यात हमखास होणारा आजार आहे. या आजारात नाक चोंदणे, डोके भणभणने, डोळे दुखणे, पाणी येणे असा त्रास होतो. यासाठी काही घरगुती इलाज सुचवले आहेत ते सहज करता येण्यासारखे आहेत.

★ उकळत्या चहात तुळशीची पाने टाकून तो प्यायल्याने सर्दी-पडसे दूर होते.

★ शुध्द तुपात भाजलेल्या सुंठीत थोडा गूळ टाकून खाल्ल्याने सर्दी-पडशाचा त्रास दूर होतो.

★ मध आणि आल्याचा रस सम प्रमाणात घेऊन त्याचे चाटण घेतल्याने सर्दी-पडसे दूर होते.

★ जायफळ पाण्यात उगाळून त्याचा लेप नाकावर व कपाळावर लावल्याने सर्दी-पडशात आराम वाटू लागतो.

★ कांद्याच्या रसात मध टाकून चाटण घेतल्याने सर्दी-पडशाचा त्रास दूर होतो.

★ सुंठाचा काढा तयार करुन तो गाळून घेऊन प्यायल्याने सर्दी-पडसे दूर होते.

★ तुळशीच्या पानांचा रस काढून तो संपूर्ण शरीरावर चोळल्यास सर्दी-पडसे दूर होते.

★ झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात लिंबाचा रस टाकून प्यायल्याने सर्दी-पडसे दूर होते.

★ पाण्यात ओवा टाकून ते उकळवा व उकळत्या पाण्याची वाफ दिवसातून दोनदा घ्या.

★ सुंठ, हळदीची पूड व गूळ यांचा काढा तयार करुन प्यायल्याने सर्दी-पडशाच्या विकारात आराम मिळतो.

★ जायफळ व दालचिनी सम प्रमाणात घेऊन त्यांचे चूर्ण करावे. या चूर्णाचे चाटण घेतल्याने पडसे दूर होते.

★ हिंगाच्या भुकटीत थोडे पाणी टाकून तिचा लेप छातीवर आणि नाकाच्या आजुबाजूला लावल्याने पडशाचा त्रास दूर होतो.

★ लवंगाचे चूर्ण राईच्या तेलात टाकून ते गरम करावे आणि छातीवर चोळावे. त्याने छातीत साचलेला कफ दूर होऊन सर्दी-पडशात आराम वाटू लागतो.

★ राईच्या चुर्णात, चूर्णाच्या निम्म्या प्रमाणात साखर टाकून ते मिश्रण पाण्याबरोबर पोटात घेतल्याने पडसे बरे होते.

★ ओव्यात थोडेसे सैंधव मीठ टाकून खाल्ल्याने सर्दी-पडसे बरे होते.

❖❖❖

# तुलसीमाहात्म्य

**तुळशीविषयी सांगावे तितके थोडेच आहे.
आज सर्व जग प्रदूषणयुक्त आणि विषाणुग्रस्त झाले असताना,
तुळस एक प्रभावी शस्त्र म्हणून आपल्यासमोर उभी आहे.**

तुलसीमाहात्म्य सांगणारे, संस्कृतमधील 'श्रीतुलसीस्तोत्रम्' आणि 'तुलसीकवचम्' ही प्रसिध्द आहेत. तसेच 'तुलसी उपनिषद' नावाचे एक नव्य उपनिषदही आहे. संस्कृत ग्रंथांमधील ही तुलसी माठी साहित्यात तुळस होऊन प्रथम आली आहे ती ज्ञानेश्वरीत! भगवद्गीतेवरील रसाळ भाष्य असणाऱ्या ज्ञानेश्वरीत भगवंतला प्रिय असणाऱ्या तुळशीचा दृष्टांत येणे स्वाभाविक आहे. ज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायात, सात्त्विक कर्माचे विवेचन करताना ज्ञानेश्वर म्हणतात -

प्रतिपाळु तरी पाटाचा। झाडी कीजे तुळसीचा।
परी फळां फुलां छायेचा आश्रयो नोही।।
(ज्ञानेश्वरी, अध्याय-१७ ओवी क्र. १८३)

अर्थ : तुळशीच्या झाडाचे उत्तम प्रकारे संरक्षण करावे. परंतु त्या संरक्षण करण्यात फळाचा, फुलाचा अथवा छायेच्या हेतुचा संबंध नसावा. त्याचप्रमाणे फलाशेशिवाय कर्म करणे हे सात्त्विक कर्म होय.

ज्ञानेश्वरांप्रमाणेच अन्य संतांच्या साहित्यातही तुळस आली आहे. संत नामदेव म्हणतात :

'तुलसीवृंदावन ज्याचे घरी।
त्यासी प्रसन्न श्रीहरी।।'

तर, संत एकनाथांनी म्हटले आहे :

'तुळशीचे पान त्रैलोक्यासमान।'

तुकाराम महाराजांनी, तुळशीपुढे अन्य सर्व तुच्छ मानले आहे. ते म्हणतात :

'कंठी मिरवा तुळशी
व्रत करा एकादशी'

तुळशीचे वनस्पतीशास्त्रीय नाव (Ocimum Sanctum) ऑसिमम सँक्टम, ऑसिममचा अर्थ 'गंध' आणि सँक्टमचा अर्थ 'पवित्र' असा आहे. तुळशीच्या पवित्र गंधामुळे दुर्गंधी नाहीशी होते. भारतात तुळस सर्वत्र उगवते. तुळशीचे झुडूप दोन ते तीन फुटांपर्यंत वाढते. तुळशीचे श्याम म्हणजे कृष्णतुळस आणि रामतुळस असे दोन मुख्य प्रकार आहेत. कृष्णतुळस उष्ण हवामानात वाढते. तिची पाने नावाप्रमाणेच काळसर-हिरव्या रंगाची असून मंजिरीवरील अत्यंत नाजूक फुले जांभळ्या रंगाची असतात; तर रामतुळस थंड हवामानात

वाढते. तिला हिरवी पाने व पांढरी फुले येतात.

तुळशीला तिच्या वैशिष्ट्यांमुळे आणि गुणधर्मांमुळे संस्कृतमध्ये अनेक अर्थपूर्ण नावे आहेत. 'भावप्रकाश', 'राजनिघण्टु', 'वैश्यदेवनिघण्टु' यांसारख्या ग्रंथांमध्ये तुळशीची विविध नावे आली आहेत. या नावांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते :

**तुळशीची उत्पत्तीबोधक नावे -** १) ग्राम्या - गावात सर्वत्र होणारी २) सुलभा - सहज उपलब्ध होणारी

**तुळशीची वैशिष्ट्यपूर्ण नावे -** १) रम्या २) सुरभि ३) सुगन्धा ४) सुरसा ५) बहुपत्री ६) स्वादुगन्धच्छन्दा ७) वृन्दा (एकत्र फुले येणारी) ८) सुमञ्जरी

**तुळशीचे विष्णुसाहचर्य दाखविणारी नावे-**

१) वैष्णवी २) विष्णुवल्लभा ३) विष्णुसुप्रिया ४) हरिप्रिया ५) कृष्णप्रिया

**तुळशीची रोगनिवारक नावे -** १) भूतघ्नी २) दैत्यघ्नी ३) अपेतराक्षसी ४) पापघ्नी (येथे भूतादी शब्दांनी रोगकारक कृमी अपेक्षित आहेत.

तुळशीची आरोग्यवर्धक नावे - १) पूतपत्री - शरीर पवित्र करणारी पाने २) पावनी - सर्व शरीराला पवित्र करणारी ३) कायस्था - शरीर स्थिर करणारी, शरीराचे आरोग्य वाढविणारी ४) शूलघ्नी - वेदना नष्ट करणारी ५) तीव्रा - त्वरित गुणकारी ६) सरला - कोणतेही संस्कार न करता खाता येणारी ७) सुभगा - कल्याणकारक ८) पूतिगन्धहा - दुर्गंधीचा नाश करणारी.

**तुळशीची देवसंबंधी नावे -**

१) सुरदुन्दुभि, देवदुन्दुभि - प्रत्येक भागात देवांचे श्रेष्ठ गुण असणारी २) सुरेज्या - देवांनी पुजलेली

इतकी नावे अन्य कोणत्याही वनस्पतीला मिळालेली नाहीत. यावरुन तुळशीचे श्रेष्ठत्व सिध्द होते.

❖❖❖

# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा

ठीक आहे, आपण सर्व दिवाळीत गरीब मुलांना मिठाई आणि कपडे भेट करु या आणि सगळ्यांबरोबर दिवाळीपण साजरी करु या.
ही तर फारच चांगली कल्पना आहे.
चला, चला सर्व मुलं एका लाईनमध्ये बसा.


ह्या सर्व मुलांबरोबर दिवाळी साजरी करुन खुपच मजा आली.
आज संध्याकाळी तुम्ही सर्व माझ्या घरी या. आपण सर्व एकत्र दिवाळी साजरी करु या.
किट्टी, आम्ही सगळे आलो आहोत.

चला! आपण सगळे फटाकड्या वाजवूया.
किट्टी बेटा, झाली ना दुखापत! मी तुम्हाला समजावलं होतं, की दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका. त्यामुळे पर्यावरणपण दुषित होतं.
ठीक आहे, काकी आता आम्ही कधी फटाके वाजवणार नाही. दिवाळी आनंद आणि प्रकाशाचा उत्सव आहे. आपण सर्व दिप प्रज्ज्वलीत करुन दिवाळी साजरी करु या.



# विनोबांचे बालपण

लहान विनायक जन्मापासून पुढे सहा-सात वर्षाचा होईपर्यंत आईबरोबर गागोद्याच्या घरी राहत असे. आई म्हणजे जीव की प्राण असे वाटण्याच्या त्या वयात एकदा आई त्याला न घेताच नातलगांबरोबर पेणला गेली. ते कळल्यावर बेचैन झालेल्या विन्याने कोणाला न सांगताच आईला शोधण्यासाठी पेणचा मार्ग धरता. उघडा, बोडका अनवाणी अवस्थेत जंगलातील ही वाट त्याने धावतच तुडवली. हे अंतर तब्बल सात मैलांचे होते. काटे बोचत होते, दगडामुळे ठेचा लागत होत्या. उन्हाने पाय पोळत होते, पण आईच्या ध्यासाने झपाटलेल्या विन्याला त्या वेदना जाणवत नव्हत्या. पेणला नेमके घर ठाऊक नव्हते. तरीही प्रत्येक घरात डोकावून तो आपल्या आईला शोधत होता. अखेर एका घरात आई सापडली.

स्थिरता त्याच्या स्वभावातच नव्हती. सतत काहीतरी करणे, चालणे, उड्या मारणे, धावणे अशा बालक्रिडा चालूच असायच्या. एकदा त्याच्या काकांनी कौतुकाने त्याला बारा फुटी भाताच्या कणग्यावर बसवले. आतातरी हा गप्प बसेल, म्हणून त्यांनी हा प्रयत्न केला होता, पण दोन तीन दिवसातच विन्याने न घाबरता त्या कणग्यावरुन निर्धास्तपणे बेधडकपणे उडी मारलीच! हाच अवखळ विन्या पुढे आचार्य विनोबा म्हणून जगदविख्यात झाला त्यांची ही सवय मात्र कायम राहिली. भूदान चळवळीच्या निमित्ताने त्यांनी संपूर्ण भारताची सलग तेरा वर्षे पदयात्रा केली. या यात्रेत त्यांनी अठरा हजार एकर जमिनीचे दान गरिबांसाठी मिळविले.

विनोबा भावे यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी कोकणातील रायगड जिल्ह्यात पेण येथे झाला. ते प्रसिध्द गांधीवादी नेते होते. महात्मा गांधीबरोबर स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी स्वत:ला झोकून दिले. धुळ्याच्या तुरुंगात असताना तेथील कैद्यांसाठी ते भगवद्गीतेवर विवेचन करतात ही 'गीता प्रवचने' त्याच तुरुंगात असलेले साने गुरुजी लिहून घेत.

विनोबांनी मुलांसाठी सोप्या भाषेत 'गीताई' लिहिली.

– विनोद अधिकारी

कथा

# मी विद्यार्थी आहे

विसाव्या शतकातील किर्तीमान शास्त्रज्ञ म्हणून अल्बर्ट आइन्सटाईन्सचे नाव घेतले जाते. त्याने 'सापेक्षतावादाचा सिध्दांत' हा प्रबंध प्रकाशित केला. तेव्हा सारे वैज्ञानिक चक्रावून गेले. आपल्या सिध्दांताच्या प्रचारार्थ त्यांनी सर्व युरोपखंडाचा प्रचार केला. त्यांचे व्यक्तीमत्त्व फार वेगळे होते. त्यांच्या सवयी जगावेगळ्या होत्या. त्यांनी आयुष्यात अनावश्यक गोष्टी कधी केल्या नाहीत. दाढी आणि आंघोळीसाठीही ते एकच साबण वापरत असत. बूट घालतानाही पायात मोजे घालण्याची त्यांना आवश्यकता वाटत नव्हती. पार्टीला जातानाही नेहमीच्या वेषात जात असे. अशा या आईनस्टाईन यांना १९२१ सालाचं भौतिकशास्त्राचं सर्वश्रेष्ठ नोबेल पारितोषिक मिळालं. जगभर त्यांची कीर्ती वाढली. त्यांच्या ज्ञानपिपासू वृत्तीचा एक किस्सा सांगितला जातो. त्यावेळी ते अमेरिकेत प्रिन्सटन येथे

स्थायिक झाले होते. प्रिन्सटनमधून त्यांच्या इन्स्टिट्युटमध्ये ते पायी चालत जात असत. एकदा समोरुन एक भौतिकशास्त्राचे प्राध्यापक येत होते. त्यांची आणि आईन्सस्टाईनची ओळख नव्हती. पण आईन्सस्टाईन यांना पहाताच ते थांबले आणि हस्तांदोलन करुन स्वत:ची ओळख देताना ते म्हणाले, "मी भौतिकशास्त्राचा प्राध्यापक आहे."

त्यावेळेस आईन्सास्टाईन यांनी प्राध्यापकांना सांगितले, "मी भौतिकशास्त्राचा विद्यार्थी आहे. हे ऐकताच प्राध्यापकाने शरमेनं मान खाली घातली."

भौतिक शास्त्राचा नोबेल विजेता शास्त्रज्ञासमोर प्राध्यापक आपला मोठेपणा दाखवायला गेले; पण आईन्सस्टाईन यांची विनम्रता आणि अभ्यासूवृत्ती त्यांच्या उत्तरातून त्यांना दिसून आली. हे विश्व एवढे विशाल आहे, की या विश्वातील रहस्यांचा शोध घेणे मानवाच्या आवाक्याबाहेरचे आहे. त्यामुळे मनुष्य जसजसा या विशालतेच्या शोधात जाऊ लागतो तसतसा तो विश्वाची गूढता अनुभवू लागतो. आपण या विशाल ज्ञानसागरातून केवळ एक थेंब प्राप्त केला आहे असं तो समजू लागतो. म्हणूनच दिवसेंदिवस त्याची ज्ञानपिपासा, जिज्ञासा शिकण्याची वृत्ती वाढत जाते. कदाचित यामुळेच असं म्हटलं आहे, मनुष्य हा शेवटपर्यंत विद्यार्थीच असतो.

- शिवहरी वानरे

# फळांची चव गोड किंवा आंबट का ?

फळांमध्ये विविध प्रकारचे तत्व असतात. त्यांना यौगिक असे म्हणतात. उदा. साखर, मीठ, पाणी, अल्कोहोल, क्लोरोफार्म इ. फळांमध्ये सामान्यत: साखर, व्हिटॅमिन, स्टार्च, प्रथिने तसेच सेल्यूलोज इ. यौगिक मिश्रित अवस्थेत आढळतात. या व्यतिरिक्त आम्लेही पर्याप्त प्रमाणात आढळतात. त्या फळांची चव आंबट असते. उदा. लिंबू.

ज्या फळांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, त्यांची चव गोड असते. प्रत्येक फळामधल्या साखरेचे प्रमाण वेगवेगळे असते. एकाच प्रकारची फळे दोन झाडांची असतील तर त्यांच्या चवीत फरक असतो.

❖❖❖

# सामान्य ज्ञान

१) 'वंदे मातरम्' गीताचे जनक ..... यांचा जन्म २५ जून १८३८ रोजी झाला.

अ) रवींद्रनाथ टागोर ब) बंकीमचंद्र क) चित्तरंजनदास ड) अरविंद घोष

२) जगात कागदाचा वापर प्रथम ..... या देशात झाला.

अ) चीन ब) भारत क) रशिया ड) जपान

३) लाल रंगाचे फूल हिरव्या लाईटच्या किरणांमध्ये ठेवल्यास ते ..... या रंगाचे दिसते.

अ) हिरवा ब) निळा क) काळा ड) नारंगी

४) ..... या देशाला 'पवन चक्क्यांचा देश' म्हणतात.

अ) भारत ब) हॉलंड क) जपान ड) नेपाळ

५) वाघांची गणना दर ..... वर्षांनी होते.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

६) ..... हा सम्राट अशोक याचा मुलगा होता.

अ) नरेंद्र ब) महेंद्र क) देवेंद्र ड) वीरेंद्र

७) दीन-ए-इलाही या धर्माची स्थापना करणारा .....

अ) सम्राट अकबर ब) सम्राट अशोक क) महमंद पैगंबर

८) ..... या वायूमुळे मतिमंदता येते.

अ) नायट्रोजन ब) हेलीअम क) कार्बन मोनॉक्साइड ड) ऑक्सिजन

९) ..... ही व्यक्तिरेखा रामायणातील नाही.

अ) कुशध्वज ब) श्रुतकीर्ती क) संजय ड) शत्रुघ्न

१०) 'विवेक' हा ..... याचा एक भाग आहे.

अ) मन ब) चित्त क) अहंकार ड) बुध्दी

उत्तरे इतरत्र

## आंतरराष्ट्रीय शांतता दिन

प्रत्येकाच्या मनामध्ये रुजावी ही शांती
जिथे नांदते शांती ती देवाची वस्ती ।।धृ।।

स्वत:पासूनी याची चला करु सुरुवात
होऊ न देऊ मनावर अशांतीचा आघात
प्रसन्नतेने अपुली बनेल सुंदर कांती।।१।।

अनुसरण करावे कुणीही असे बनावे जीवन
सहजच घडून येईल समाज परिवर्तन
मानवतेने मनामनाची जुळून येतील नाती।।२।।

गावे, शहरे आणि प्रांत करिती जरी स्वीकार
हाहाकार या जगातुनी होईल हद्दपार
सुख समाधानाची मिटून जाईल भ्रांती ।।३।।

वैर ना कोणाशी काही नसे तक्रार
दाही दिशांना मानवतेचा होईल सदा सत्कार
घडावी ऐसी देवा या जगती क्रांती ।।४।।

## आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन

सामर्थ्य असे अक्षरामध्ये देई जीवनी सुंदरता
परिवर्तन करी जगताचे अशी असे ही साक्षरता ।।धृ।।

मुलांमुलींना ठाऊक नव्हते शिक्षण म्हणजे काय
वडिलोपार्जित जो असलेला करिती तो व्यवसाय
पाल्यांनाही नव्हते ज्ञान तो काळ असा होता ।।१।।

सुशिक्षित जाहली मुले जाहले प्रगत विज्ञान
प्रौढ शिक्षणालाही दिधले विशेष ऐसे स्थान
खेडोपाडी घरा-घरातून महत्त्व कळले आता ।।२।।

बोल चाल जाहली सुधारित सुंदर राहणीमान
दिशा उमजली संस्काराची सजले जीवनमान
सकळांना समजून घेण्याची आली असे क्षमता ।।३।।

प्रत्येक मनावर याचा घडला साक्षात्कार
समाज परिवर्तन झाले सुंदर झाले व्यवहार
गेली विषमता सारी आली खरी समता ।।४।।

# डस्की ग्रुपर

डस्की ग्रुपर हा मासा मेडिटेरॅनीयन समुद्रात आढळतो. तसेच उत्तर आफ्रिकेतील समुद्र किनारी त्यांचे वास्तव्य दिसून येते. मेडिटेरॅनीयन हा मासा चवीला अतिशय उत्कृष्ट असतो असे म्हटले जाते. डस्की ग्रुपर या माशाचे शरीर हे आकाराने बरेच मोठे असते. तसेच तोंडाचा आकारही मोठा असतो. त्यांच्या पाठीवर एक लांब मोठा पंख असतो. त्यांच्या शेपटीचा आकार हा गोलाकार असतो. त्यांच्या शरीराचा रंग विविध प्रकारचा असतो. गडद ब्राउन ते हिरव्या रंगापर्यंत छटा, वातावरण ऋतुमान आणि वयाप्रमाणे कमी जास्त प्रमाणात आढळतात. तरुण वयात हा मासा हिरव्या रंगाचा असतो. जसे जसे वय वाढत जाते तसे त्याच्या शरीराचा रंग ब्राउन होतो आणि त्यावर पिवळे ठिपके असतात. पोटाकडे त्याचा रंग पिवळा असतो.

डस्की ग्रुपर हा एकटा राहणारा मासा आहे. समुद्र किनाऱ्यापासून ३०० मीटर खोल खडकात एकटं राहणं डस्की ग्रुपरला आवडते. क्वचित कधी तो ६० मीटर खोलीपर्यंतही आढळतो. वयामुळे या माशातील वागण्याचा फरक म्हणजे यातील तरुन मासे हे समुद्रकिनाऱ्याच्या आसपास राहतात तर वयस्कर मासे हे समुद्राच्या खोलीत राहतात. हा मासा खडकातील गुहांना आपले घर मानतो. ह्याच्या घराला बाहेर पडायला दोन तोंडं असतात. आणि गुहेचा आकार त्याच्या शरीरापेक्षा किंचित मोठा असतो. त्यामुळे मोठ्या प्राण्याला आत येता येत नाही.

मेडिटेरॅनीयन समुद्रा व्यतिरिक्त तो उरुग्वे, अर्जेंटिना, फ्रांन्स, ब्रिटिश आयलंड आणि हिंदी महासागरात काही वेळा आढळतो. उन्हाळ्याच्या दिवसात ते अंडी घालतात. हा मासा आक्रमक असून मासे, खेकडे, ऑक्टोपस हे त्याचे खाद्य आहे. वजन ३ किलो पासून ६० किलोपर्यंत असते.

**-संग्राहक : स्वप्निल वि.ऱ्हाटवळ**

**प्रश्न : ई. सी. जी. म्हणजे नेमक काय?**

उत्तर : ई. सी. जी. म्हणजे इलेक्ट्रोकार्डिओग्राम. याला आपण हृदयस्पंदनालेख असेही म्हणू शकू. आजकाल एखाद्या व्यक्तीला अचानक चक्कर आली, डोळ्यासमोर अंधारी आली वा छातीत धडधडले तर ई. सी. जी. काढून घेण्याचा सल्ला दिला जातो. चाळीशी ओलांडल्यानंतर दर दोन वर्षांनी ई. सी. जी. काढून घेणे श्रेयस्कर असेही म्हणतात. ई. सी. जी. काढण्याच्या या वाढत्या प्रमाणामुळे हृदयाबद्दलच्या जिज्ञासेमुळे, हृदयविकाराच्या भीतीमुळे आपल्याला ई. सी. जी. म्हणजे नेमके काय प्रकरण आहे हे जाणून घ्यायची जिज्ञासा असेल. ई. सी. जी. म्हणजे काय ? हे आता पाहू.

हृदयाच्या स्नायूंच्या आकुंचनप्रसरणात विद्युतलाटा वा विद्युतप्रवाह तयार होतात. याची नोंद शरीराच्या विविध भागांवर (छाती, पाय इ.) संवेदनशील असे इलेक्ट्रोड ठेवून करता येते. कारण हे विद्युतप्रवाह हृदयापासून सर्व ठिकाणी असे पसरविले जातात. या विद्युतप्रवाहाच्या शक्तीनुसार एका यांत्रिक उपकरणाच्या सहाय्याने हृदयाच्या स्पंदनाचा आलेख काढता येतो. ई. सी. जी. हे डॉक्टरांसाठी वरदानच ठरले आहे. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या हृदयस्पंदनालेखात P, Q, R, S व T या विद्युतलाटा (Waves) असतात. त्यांचे निरोगी लोकांसाठीचे आकार (उंची, रुंदी इ.) तसेच एकमेकांतील (त्या लाटांचे) अंतर ठरलेले असते. हृदयाच्या वेगवेगळ्या विकारावरुन या आलेखात बदल घडून येतात व त्यावरुन रोगाचे निदान करण्यात येते. हृदयाचा आकार, हृदयाची गती, जास्तीचे ठोके वा न पडणारे ठोके, हृदयातील जवनिका, कर्णिका या कप्पांमधील सुसंवाद, हृदयाच्या स्नायूंचा रक्तपुरवठा इ. अनेक गोष्टींची माहिती यामुळे मिळू शकते. हृदयविकाराचा झटका येण्यापुर्वी काही बदल ई. सी. जी.मध्ये सापडू शकतात. अशा व्यक्तींनी वेळीच आहार, विहार यावर नियंत्रण ठेवले तर पुढील अनर्थ टाळता येऊ शकेल. यावरुन ई. सी. जी. चे महत्त्व आपल्या लक्षात येईल. ई. सी. जी. काढण्यासाठी येणारा खर्च लक्षात घेता तो काढण्यापूर्वी खरेच तो काढण्याची गरज आहे काय, याचा साधकबाधक विचार तज्ज्ञांच्या सल्ल्याने करणे श्रेयस्कर ठरेल.

**प्रश्न : घामाची चव खारट का असते?**

**उत्तर :** शरीरात तयार होणारे निरुपयोगी पदार्थ उत्सर्जन संस्थेमार्फत शरीराच्या बाहेर टाकले जातात. युरियासारखे पाण्यात द्राव्य असणारे पदार्थ मूत्र आणि घामावाटे (त्वचेच्या छिद्रातून) बाहेर टाकले जातात. ह्या पाण्यात युरियाबरोबर मीठ आणि इतर क्षारसुध्दा बाहेर पडतात. मिठाची चव खारट असल्यामुळे घामाची चव खारट असते.

# स्मॉल ग्रीन आऊलेट

**पतंगासारखं दिसणारं व आकाराने अगदी लहान असणारं हे फुलपाखरु. स्किपर जातीतील या फुलपाखराचा वावर भल्या पहाटे किंवा संध्याकाळी उशिरा असतो, त्यामुळे ते सहजपणे दिसून येत नाही.**

स्किपर ही जात फुलपाखरांची असली तरी त्यांचा एकंदर अविर्भाव हा पतंगासारखा असतो. त्यांच शरीर पतंगासारखंच जाडसर असतं व रंगही साधारणतः मातकट असतात. यांच्यातील काही जाती पतंगांसारख्याच पंख पसरवून बसतात, तर काही जाती मात्र फुलपाखरांसारख्या पंख मिटून बसतात. जगभरात स्किपर जातीची सुमारे ३५०० फुलपाखरं आढळतात. त्यातील ३२१ जातींची फुलपाखरं आपल्याकडे भारतात दिसून येतात. अशीच पतंगासारखी दिसणारी फुलपाखराची एक जात म्हणजे स्मॉल ग्रीन आऊलेट.

ही फुलपाखरं अतिशय लहान असल्याने त्यांचं छायाचित्रण करणं सहज शक्य नसतं. म्हणूनच चक्क रस्त्यात लोळण घेऊन त्यांचं छायाचित्रण करावं लागतं. हे रंगीत चमकदार फुलपाखरु म्हणजे स्मॉल ग्रीन आऊलेट. पिवळ्या-मातकट रंगाचं हे फुलपाखरु अतिशय आकर्षक दिसतं.

याचं वैशिष्ट्य म्हणजे याचं शरीर व पंख वेगळ्या रंगाचे असतात. याच्या पंखांवर काळ्या-पांढऱ्या रंगाचे उभे पट्टे असतात. हे पंख उडताना करड्या-राखाडी रंगाचे दिसतात. याचा वावर भल्या पहाटे किंवा संध्याकाळी उशीरा असतो, त्यामुळे ते सहजपणे दिसून येत नाही. यातील काही काही जाती मात्र दिवसासुध्दा उडताना दिसतात. यांचा एकंदर मातकट, मळखाऊ रंग, जलद उडण्याची पध्दत आणि अंधाऱ्या वेळी उडण्याच्या सवयीमुळे ही सहसा आढळून येत नाहीत. पण यातील काही काही जाती अगदी सहज दिसतात तर काही काही जाती शोधूनही सापडत नाहीत. तसेच ते केवळ अरुणाचल प्रदेश, सिक्कीम या भागातच आढळतं. ❖❖❖

# रंग भरा

## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) अ
३) क
४) ब
५) ड
६) ब
७) अ
८) क
९) क
१०) ड

१९१

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ख्रि | स | २म | ३स | | ४नि |
| | श्च | | ५द | हा | | ष्प |
| ६श्री | न | ७ग | र | | ८मो | क्ष |
| न | | ण | | ९ग्र | ह | |
| ग | | १०ना | ११व | | रा | |
| १२र | शि | य | न | | १३म | १४न |
| | | १५क | रा | १६ची | | कु |
| १७गं | गा | | १८ज | न | र | ल |

!! तू ही निरंकार !!

सद्गुरुची जर होईल मर्जी सुख शांती नांदेल घरी । सद्गुरुची जर होईल मर्जी प्रकाशित तव मना करी ।
सद्गुरुची जर होईल मर्जी पंगू पर्वत पार करी । अवतार गुरुमर्जी जर होई अशक्य तेही शक्य करी ।

शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

# महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...
लग्न बस्त्याची खास सोय !

अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु को सिर पर राखिये, चलिए आज्ञा माहिं ।
कहैं कबीर ता दास को, तीन लोकों भय नाहिं ।

सत्संग वो वैकुंठ जहा पर देव देविया बसते है ।
आनंद ही आनंद जहा पर सुख ही सुख बरसते है।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019-21
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


।। तुही निरंकार ।।

जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

## मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स

मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

## मे. राज इंडस्ट्रीज

मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल

## बाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
अंकित रा. पाटील
राकेश ज. पाटील
कुशल रा. पाटील